श्री.ज्ञानदेव रा.मडके, (निलंबित) तत्का. प्रभारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती,जत जिल्हा सांगली यांना पदस्थापना देण्याबाबत.

.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन आदेश क्रमांकः मविसे-१०/प्र.क्र.४०/२०१९/आस्था-३ (अ)
मंत्रालय, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, मुंबई - ४०० ००१.
तारीख: २२ जुलै, २०१९.

वाचा :-

१. विभागीय आयुक्त,पुणे यांचे आदेश क्र.रोहयो/अ.का.२/कावि१७/दि.२४.३.२०१७
२. नियोजन विभाग (रोहयो) यांचे शासन आदेश क्र.रोहयो/१३१८/प्र.क्र.९०/रोहयो-२/दि.२८.५.२०१९

शासन आदेश :-

श्री. ज्ञानदेव रा.मडके,सहा.गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जत तथा तत्का.प्रभारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जत व इतर अधिकारी व कर्मचारी यांनी सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील मौजे काशिलिंगवाडी, एकुंडी व बाज या तीन ग्रामपंचायतींमधील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अंतर्गत माती नालाबांध, शेततळी व सिमेंटनाला बांध इत्यादी कामांमध्ये अनियमितता व गैरव्यवहार केल्याच्या आरोपाच्या अनुषंगाने, त्यांचेवर जत पोलीस स्टेशन येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यांत आलेला आहे. त्यानुसार श्री.मडके यांना विभागीय आयुक्त पुणे यांनी दिनांक २४.३.२०१७ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे.

२. श्री.मडके यांनी त्यांना शासनसेवेत पुर्नस्थापित करण्याची विनंती केली आहे. त्यांच्या निलंबनास दोन वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला आहे. तसेच, विभागीय आयुक्त पुणे यांनी दिनांक २८.२.२०१९ च्या ज्ञापनान्वये श्री.मडके यांच्यावर दोषारोप पत्र बजावून विभागीय चौकशी कारवाई सुरु केली आहे. श्री.मडके यांनी निलंबन रद्द करण्याबाबतच्या कार्यवाहीस विलंब होत असल्याने महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई येथे निलंबन रद्द करुन शासन

सेवेत पुर्नस्थापित करण्याबाबत मूळ अर्ज क्र.१८२/२०१९ दाखल केला आहे. मा.न्यायाधीकरणाने दि.१४.३.२०१९ च्या आदेशान्वये श्री.मडके यांना शासन सेवेत पुर्नस्थापित करण्याबाबत निर्णय घेण्याचे निदेश दिलेले आहेत. त्यानुसार नियोजन विभागाने दिनांक २८.५.२०१९ च्या आदेशान्वये श्री.मडके यांचे निलंबन रद्द करुन व विभागीय चौकशीच्या अधीन राहून शासन सेवेत पुर्नस्थापित केले आहे.

३. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता श्री.मडके,तत्का.प्रभारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जत जिल्हा सांगली यांना सहाय्यक प्रकल्प अधिकारी, (सनियंत्रण) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा कोल्हापूर या रिक्त पदावर पदस्थापना देण्यात येत आहे. श्री.मडके यांनी पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे, त्यांनी अनधिकृतपणे रजेवर जाऊ नये. विभागीय आयुक्त पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी श्री.मडके यांना पदस्थापनेच्या पदावर रुजू करुन घ्यावे व शासनास तसे अवगत करावे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२०१६५३४७१८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA NATHA SAVANE

Digitally signed by RAJENDRA NATHA SAVANE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0a2ac5ab6ca0075cc776c90ec03925f2eb8727640eacf311beb6f68d63939303, postalCode=400032, street=MANTRALAYA , MUMBAI, serialNumber=f049989dbbef93340e9edd88af960a0963746d42baa5c948405b62e821529a99, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJENDRA NATHA SAVANE
Date: 2019.07.22 12:52:45 +05'30'

(रा.ना.सवने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
३) मा. प्रधन सचिव (ग्राम विकास व पंचायत राज).
४) विभागीय आयुक्त, पुणे.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली/कोल्हापूर
६) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सांगली/कोल्हापूर
७) महालेखापाल- २ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
८) संबंधित अधिकारी (द्वारा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली)
९) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग,रोहयो-२, मंत्रालय, मुंबई.